# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.10.2025** **वारःबुधवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत 9 व्या इंडिया मोबाईल कॉंग्रेसच उद्घाटन
2. पंतप्रधान आजपासून दोन दिवस मुंबईच्या दौऱ्यावर
3. देशातील एकंदर 894 किलोमीटरच्या रेल्वे मार्गिकांच्या विकासाला काल केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
4. 2026 या आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकासाचा दर 6 पूर्णांक 5 टक्के राहण्याचा जागतिक बँकेचा अंदाज आणि
5. महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल गुवाहाटी इथं इंग्लडचा बांग्लादेशवर 4 गडी राखून विजय

**<u>मोबाइल कॉंग्रेस</u>**

दूरसंचार आणि मोबाइल क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठी समजली जाणारी 9 वी इंडिया मोबाइल कॉंग्रेस आजपासून नवी दिल्लीत सुरू होत असून त्याच उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. 'परिवर्तनासाठी नव संशोधन' ही यावर्षीच्या या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना असून डिजिटल विकास आणि त्याद्वारे सामाजिक विकास हा त्यामागचा हेतु आहे. या परिषदेत मोबाइल क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, 5 जी, 6 जी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, विविध सायबर हल्ल्यांचे धोके ॲनी सायबर सुरक्षा व्यवस्था आदि नवसंशोधनावर यामध्ये 100 सत्रांच्या माध्यमातून जगभरातील 8 शे तज्ञ आपले विचार मांडणार आहेत. या परिषदेला जगभरातल्या सुमारे दीडशे देशातील 4 शे कंपन्यांचे प्रतिनिधी तसच सुमारे दीड लाख नागरिक भेट देण्याची शक्यता आहे.

**<u>पंतप्रधान महाराष्ट्र दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आणि उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून आज त्यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन होणार आहे. मुंबई मेट्रो लाईन-3 च्या अंतिम टप्प्याचं लोकार्पणही पंतप्रधान करणार आहेत. त्यानंतर ते 'मुंबई वन' या भारतातील पहिल्या एकात्मिक मोबिलिटी ॲप, तसंच राज्यातील अल्पकालीन रोजगार अभ्यासक्रमांचा आरंभ करतील. दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय हवाई वाहतुकीशी जोडला जाईल आणि त्यातून रोजगार आणि गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध होतील, असं केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे.

**<u>केंद्रीय मंत्रिमंडळ</u>**

देशातील एकंदर 894 किलोमीटरच्या रेल्वे मार्गिकांच्या विकासाला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. यासाठी एकंदर 24 हजार 634 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल

दिली. यामध्ये महाराष्ट्रातील भुसावळ आणि वर्धा दरम्यानच्या 314 किलोमीटरच्या रेल्वे मार्गावरच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेला, तसंच गोंदिया-डोंगरागड या 84 किलोमीटरच्या रेल्वे मार्गावरच्या चौथ्या मार्गिकेला मंजुरी मिळाली. तसच इटारसी-भोपाळ-बिना दरम्यान चौथी मार्गिका, आणि वडोदरा-रतलाम दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेलाही केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<u>ब्रिटन पंतप्रधान दौरा</u>**

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर आजपासून 2 दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. उद्या मुंबईत पंतप्रधान कीर स्टार्मर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट होणार असून यावेळी दोन्ही नेते भारत-ब्रिटन दरम्यान व्हीजन 2035 या पुढील 10 वर्षांच्या विविध क्षेत्रातील धोरणात्मक भागीदारी बाबत द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेणार आहे. तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही त्यांच्यात चर्चा होईल. मुंबईत सुरू असलेल्या 6 व्या ग्लोबल फिनटेक फेस्ट मध्ये ही दोन्ही नेते सहभागी होणार असून त्यात ते मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी दोन्ही नेते विविध उद्योगांच्या प्रमुखांशीही चर्चा करणार आहेत. दरम्यान, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

**<u>फिनटेक-सितारामन</u>**

लाभार्थ्यांच्या खात्यात थेट मदत पाठवता आल्यानं केंद्र सरकारनं गेल्या 11 वर्षात 4 लाख 31 हजार कोटी रुपयांची बचत केली आहे आणि लाभार्थ्यांची संख्या 16 पटींनी वाढली आहे अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. मुंबईतील ग्लोबल फिनटेक फेस्टच्या उद्घाटन समारंभात त्या काल बोलत होत्या. गिफ्टसिटीमधले परकीय चलनाचे व्यवहार तत्काळ पूर्ण व्हावे यासाठीच्या नव्या यंत्रणेचं अनावरण त्यांनी केलं. यापूर्वी या व्यवहारांना 36 ते 54 तास लागत होते. आधार, यूपीआय, डिजिलॉकर, आर्टिफिशियल इंटेलिजेंस वापरून करता येणाऱ्या बँकिंग, वित्त, फिनटेक या क्षेत्रातील विविध उपक्रमांवर यावेळी सीतारामन यांनी आपल्या भाषणात प्रकाश टाकला. तंत्रज्ञान हा आपल्यासाठी एक विश्वासार्ह सेतू असावा आणि त्यानं सक्षमरित्या गोपनीयतेचं रक्षण करावं अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>फिक्कीफ्रेम्स-मुंबई</u>**

माध्यम आणि मनोरंजन उद्योगात गेल्या 25 वर्षांत उल्लेखनीय प्रगती झाली असून 25 हजार कोटी रुपयांवरुन हा उद्योग आता अडीच लाख कोटी रुपयांवर गेला असल्याचं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी काल मुंबईत सांगितलं. रौप्यमहोत्सवी फिक्की फ्रेम्सचं उद्घाटन करताना ते बोलत होते. फिक्की फ्रेम्स आणि मराठी चित्रपटातला संबंध वाढवू असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परिषदेत दिलं. वेव्हज ओटीटी हा मंच सर्व प्रकारच्या भारतीय कंटेंटसाठी सर्वसमावेशक व्यासपीठ आहे, अशी माहिती प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी दिली.

**<u>आर्थिक दर</u>**

2026 या आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकासासचा दर 6 पूर्णांक 5 टक्के इतका राहण्याचा अंदाज जागतिक बँकेने वर्तवला असून, भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वात जास्त वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असेल

अस ही जागतिक बँकेने म्हंटल आहे. यापूर्वी जून मध्ये जागतिक बँकेने भारताचा विकास दर 6 पूर्णांक 3 टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला होता. जी एस टी सुधारणांचा झालेला सकारात्मक परिणाम, नागरिकांची वाढलेली क्रयशक्ती, ग्रामीण भागातील आर्थिक विकास आदि कारणांमुळे भारताचा आर्थिक विकास दर वाढणार असल्याचा अंदाज जागतिक बँकेने वर्तवला आहे. मात्र 2027 मध्ये अमेरिकेने भारतावर लावलेल्या 50 टक्के टेरिफमुळे हा विकास दर कमी होऊन 6 पूर्णांक 3 टक्के राहण्याचा अंदाज ही जागतिक बँकेने वर्तवला आहे.

**राज्यमंत्री मंडळ**

महाराष्ट्रातील पूर बाधित आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने काल 31 हजार 628 कोटी रुपयांचं मदत पॅकेज जाहीर केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. राज्यातल्या एकंदर 68 लाख 69 हजार 753 हेक्टरवरच्या पिकाचं नुकसान झालं असून 29 जिल्ह्यांमधल्या 253 तालुक्यांत दोन हजार 59 मंडळांतल्या शेतकऱ्यांना तसंच कोरडवाहू, हंगामी बागायती तसंच बागायती शेतकऱ्यांनाही राज्य सरकार नुकसानभरपाई देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. विहिरी, पायाभूत सुविधा पुन्हा उभारण्यासाठी, तसंच घरं, गोठे, दुकानं, जनावरांचं नुकसान झालेल्यांनाही अर्थसहाय्य देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**राष्ट्रपती**

भारतीय वायु सेनेचा आज 93 वा वर्धापनदिन असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वायुदलातील सर्व आजी माजी अधिकारी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. वायुदल भारताच्या आकाश सीमांच रक्षण करतेच पण त्याचबरोबर अनेक नैसर्गिक आणि राष्ट्रीय आपत्ति प्रसंगी तत्पर मदत कार्याच्या माध्यमातून उत्तम देशसेवा बजावत असल्याच राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हंटल आहे.

**महिला-विश्वचषक**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल गुवाहाटी इथं झालेल्या सामन्यात इंग्लडनं बांग्लादेशवर 4 गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय इंग्लडच्या संघानं घेतला. त्यांच्यापुढे 179 धावांचं आव्हान बांग्लादेशनं ठेवलं होतं. इंग्लंडकडून सोफी एक्लेस्टोनने सर्वाधिक 3 बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल हीथर नाईटच्या नाबाद 79 धावांच्या जोरावर हा विजय इंग्लडला मिळाला. तिला सामनावीराचा पुरस्कारही मिळाला. आज ऑस्ट्रेलियाचा सामना कोलंबो इथं पाकिस्तानशी होईल.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, लक्षद्विप, रायलसीमा आणि गोवा या भागात आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तसच आसाम, मेघालय, मिझोरम, त्रिपुरा, मनिपूर, कर्नाटकचा किनारपट्टी भाग, केरळ, माहे आणि तामिळनाडू इथं आज पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.**